## नि.दि.मु.क्र.१५/२०१६ मधील निशाणी क्र. ८४ वरील आदेश

## (CNRNo.MHSI090000432016)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. उभय पक्षांच्या कथनांच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१९ कृष्णा, क्र.२८ नामदेव व क्र.२९ राजेंद्र मासये हे अनुक्रमे दि.०६/०१/२०२१, दि.१४/०९/२०२१ व दि.१६/०३/२०१७ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूतचा दावा हा वाटपाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ च्या अनुषंगाने दाव्याचे कारण शिल्लक राहते. परीणामी, दाव्याचे स्वरुप व मागील कोरोना महामारी व ताळेबंद परीस्थिती लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आदेश –

१. निशाणी क्र. ८४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. वादी यांनी खर्च म्हणुन रु.२००/–(रूपये दोनशे फक्त)प्रतिवादींना द्यावे.
३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.07.07 11:19:40 +0530

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : ०६/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.